# प्रास्ताविक

प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक संस्कृतीच्या जडण-घडणीमध्ये धर्माचा महत्त्वाचा वाटा होता. म्हणूनच धर्म म्हणजे संस्कृती असे समिकरण सर्वत्र पाहावयास मिळते. धर्मामुळे मानवी जीवनात उदात्त स्वरूपाचा साक्षात्कार होतो. परंतु या धर्माचे स्वरूप इतिहास काळात वेळोवेळी बदलत गेले. यादवकालीन धार्मिक जीवन परमेश्वराच्या सगूण उपासनेने भरलेले होते. विठ्ठल-रूक्मिणी, तुळजाभवानी, कोल्हापूरची अंबाबाई आणि खंडोबा इत्यादि दैवतांची उपासना यादव काळात मोठ्या प्रमाणावर होत होती. परंतु महानुभव वाङ्मयामध्ये गणपती, नरसिंह, नागनाथ, वैजनाथ, मैराळ, राम, गोपाळ, नारायण, महालक्ष्मी, भैरव इत्यादी अनेक देवतांच्या मंदिराचा उल्लेख आढळतो. जाखाई, जोखाई, मरिआई, सटवाई, भैरोबा, म्हसोबा इत्यादी ग्रामदेवता ही काही जमातीमध्ये आदरणीय होत्या. अशा विविध धार्मिक स्थळांची पार्श्वभूमी पाहिली असता, महाराष्ट्राला धार्मिक स्थळांची फार मोठी देणगी मिळालेली दिसून येते. म्हणून धार्मिक स्थळे ही मानवी जीवनाचे अंग मानल्याने हा घटक समाजावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम करताना दिसून येतो.

सुरूवातीला इतिहास लेखनासाठी ग्रीकांनी प्रामुख्याने राजकीय घटना, लढाया, युध्दे हे विषय निवडले असले तरी काळाच्या ओघात इतिहास लेखनात फार मोठ्या प्रमाणावर बदल होत गेला. अठरावे शतक हा बुध्दीवाद्यांचा काळ ठरला तर एकोणिसाव्या शतकात इतिहासाच्या विषयात मूलगामी बदल घडून आले. त्या काळात मानवी जीवनाचा अधिकाधिक व्यापक दृष्टीने विचार होऊ लागला. माणूस हा एकाकी प्राणी नसून तो समाजाचा अविभाज्य घटक आहे, त्याच्या जडणघडणीत समाजाचा वाटा आहे.

विसाव्या शतकातील इतिहास लेखनातील एक महत्त्वाचा इतिहास प्रकार म्हणजे प्रादेशिक इतिहास होय. एखाद्या विशिष्ट प्रदेशाच्या अध्ययनामागील मुख्य हेतू, त्या प्रदेशाची सखोल व सर्वांगिण माहिती करून घेणे हा असतो. प्रादेशिक इतिहासाचाच एक भाग म्हणजे स्थानिक इतिहास होय. भारताचा इतिहास हा प्रादेशिक इतिहास तर चेन्नई, बेंगलोर अशा शहरांचे इतिहास स्थानिक इतिहासात समाविष्ठ होतात. स्थानिक इतिहासामध्ये सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक इतिहास इत्यादी बाबींचा समावेश होतो.

धार्मिक इतिहासात ज्या युगात जी धर्मभावना प्रबळ असते तिचा विचार केलेला असतो. प्रो. रेनियर म्हणतात, 'Ecclesiastical History is not the same subject as history of religion. It belongs to political more than to social history. The story of the Church of Rome cannot be separated from diplomatic history, not needed from military history'. धार्मिक जीवनाचा अभ्यास करीत असताना मानवाची जी विविध अंगे महत्त्वाची मानली आहेत त्यापैकी धार्मिक स्थळे हे एक महत्त्वाचे अंग आहे. धार्मिक स्थळांची पार्श्वभूमी, महत्त्व, ठिकाणे, यात्रा, उत्सव आणि पर्यटनाच्या निमित्ताने होणारी आर्थिक उलाढाल व आचार विचारांचे अभिसरण इत्यादि घटकांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. हे सर्व घटक समाजाच्या विविध अंगावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कसे परिणाम करतात हे जाणून घेण्यासाठी "सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहासः एक चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला होता.

भारत भूमी ही विविध धर्मांची जन्मभूमी असून येथे अनेक धर्म, पंथ व उपपंथ निर्माण झाले. मध्ययुगीन काळात भक्तीची लाट संपूर्ण देशभर निर्माण झाली होती त्यातून महाराष्ट्रात अनेक भक्तीसंप्रदाय उदयाला आले. वारकरी, दत्त, नाथ, वीरशैव (लिंगायत) आणि सुफी इत्यादी संप्रदाय व भक्तीपंथांचा त्यात समावेश होतो. सोलापूर शहरात हिंदु, जैन, बौध्द, लिंगायत, मुस्लिम, ख्रिश्चन अशा विविध धर्म व पंथाचे लोक राहतात. अशा धर्माचा वा पंथाचा प्रभाव सोलापूर शहरावर पडलेला दिसून येतो.

तेराव्या शतकात भारतात सुफींचे आगमन झाले, त्यांनी भारताच्या विविध भागात आपल्या पंथाचा प्रसार व प्रचार करून लोकजागृती करण्याचा प्रयत्न केला, असे अनेक सुफी संत सोलापूर शहर व जिल्ह्यातही कार्यरत होते. त्यांनी याच भूमीत आपला देह ठेवला, त्यामुळे सोलापूर शहर व परिसरात अनेक सुफी संतांचे दर्गे पाहावयास मिळतात. ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी ख्रिश्चन मिशनरी आणि मिशन्स् सोलापूरात आले. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी सोलापूर शहर व परिसरात विविध चर्चेसची निर्मिती केली.

अशा विविध धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने दरवर्षी विविध देव-देवतांच्या यात्रा, उरूस व उत्सवाच्या निमित्ताने कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील अनेक भाविक सोलापूर शहरात येतात त्यामुळे येथे विविध संस्कृतींचा संगम पहावयास मिळतो.

## विषयाची निवड

सोलापूर शहरातील विविध जाती-धर्मांच्या लोकांनी आपापला धर्म व संस्कृती टिकवून ठेवली आहे. त्या अनुषंगानेच शहरात विविध धर्मीयांची धार्मिक स्थळे (देवालये) निर्माण झाली. परंतू धार्मिक परिस्थितीबद्दल अथवा धर्मस्थळाबद्दल माहिती देणारे परिपूर्ण असे लिखाण झाले नाही. शहरात असणाऱ्या ऐतिहासिक वास्तू, देवालये, मशिदी, दर्गे, गुरूद्वार, चर्च, अग्यारी, बौध्द विहार यांचा शोध घेण्यासाठी "सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहासः एक चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडण्यात आला. या धार्मिक स्थळाद्वारे संस्कृतीची देवाण-घेवाण, आचार-विचार, बोलीभाषा कशा प्रकारे साधली गेली आहे हे या संशोधनाद्वारे स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून मांडले आहे.

## साहित्याचे पुनर्विलोकन

सोलापूर शहराच्या विविध विषयांवर अनेक विचारवंतांनी लिखाण केले आहे. परंतु धार्मिक स्थळांच्या अंगाने परिपूर्ण असे लिखाण कोणीही केलेले नाही. त्यामुळे "सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास - एक चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला.

विठ्ठल नरसप्पा जक्कल यांनी सन १९२९ मध्ये 'सोलापूर शहराचा इतिहास' हा ग्रंथ लिहिला यामध्ये वेशी, पेठा, शहराचा राजकीय इतिहास, दुष्काळ, काही धार्मिक ठिकाणे, शहराचा व्यापार इत्यादी घटकांच्यावर त्यांनी प्रकाश टाकला. गणेश पंढरीनाथ कुलकर्णी यांनी सोलापूर नगरपालिकेची माहिती देणारा 'शतसंवत्सरिक ग्रंथ' १९५३ मध्ये प्रसिध्द केला. नगरपालिकेचा कारभार, लोकसंख्या, आरोग्य, पाणी पुरवठा, निवडणुका, शहराचा विस्तार इत्यादी बाबतची माहिती त्यांनी या ग्रंथात दिली आहे.

कवि राघवांक यांचे 'श्री सिध्दरामेश्वर पुराण' प्रसिद्ध असून डॉ. जयदेवीताई लिगाडे, शशिकला मडकी, राजशेखर मडकी, चंद्रशेखर कपाळे इत्यादी लेखकांनीही श्री सिध्देश्वरांच्या विषयी माहिती देणारे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. परंतु त्यांच्या ग्रंथातून धार्मिक स्थळांविषयी माहिती मिळत नाही. भगवंत अघोर यांच्या 'पुण्यात्मा पांडुरंग' या ग्रंथात शहरातील जुन्या विठ्ठल मंदिराची त्रोटक स्वरूपाची माहिती उपलब्ध आहे.

बामणगांवकर ना. रा. यांच्या 'पुण्यश्लोक वारद' या ग्रंथातून आप्पासाहेब वारदांचे चरित्र व त्यांचा धार्मिक दृष्टीकोन पाहावयास मिळतो. आशण्णा ईराबत्ती यांनी लिहिलेल्या 'माझ्या आयुष्यातील टिपणे व प्रवास वर्णने' या ग्रंथात पद्मशाली समाजाची व मार्कंडेय मंदिराबद्दलची माहिती आहे. व्ही. जी. अंदूरकर, निलकंठ पुंडे, शं. भा. येवले, डॉ. श्रीकांत येळेगांवकर, गोपाळराव देशमुख यांनी सोलापूर शहर व जिल्ह्यातील राजकीय व स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासाचा आढावा घेतला असून त्यांच्या ग्रथात धार्मिक स्थळांविषयी माहिती मिळत नाही.

डॉ. रणनवरे डी. डी. यांनी 'History of Solapur' (१८५२-१९५२) या ग्रंथामध्ये सोलापूर नगरपालिकेचे प्रशासन, उत्पन्न व खर्च, आरोग्य, शिक्षण, सामाजिक चळवळी, उद्योगधंदे व कामगार चळवळी इत्यादी विषयांवर लिखाण केले आहे. डॉ. लता अकलुजकर यांनी 'किल्ले सोलापूर' नावाचा ग्रंथ लिहून सोलापूरच्या भूईकोट किल्ल्याचा इतिहास मांडला आहे तर डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी 'सोलापूरची गिरणी कामगार चळवळ' या विषयावर कामगार आणि शहरातील उद्योगावर माहिती दिली आहे. डॉ. सोपान जावळे यांनी प्रकाशित केलेला 'सोलापूर शहर व परिसराचा इतिहास' आणि 'सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन ऐतिहासिक स्मारकाचा टिकात्मक अभ्यास' (१२०६-१८१८) या विषयावर स्वराली कुलकर्णी यांनी संशोधन केले परंतू या ग्रंथातून सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांची माहिती फारच त्रोटक स्वरूपात पहावयास मिळते.

## संशोधनाची व्याप्ती व महत्त्व

सदरचे संशोधन हे सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांशी संबंधित असले तरी संशोधनातून काढलेले निष्कर्ष हे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक अभिसरणच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे आहेत. हे संशोधन सोलापूर शहरापूरते मर्यादित असले तरी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर देखिल ते महत्त्वाचे ठरणार आहे. धार्मिक स्थळांचा अभ्यास करताना या ठिकाणी असणाऱ्या विविध धर्म व पंथांचा विकास कसा झाला आणि त्या अनुषंगाने सण, यात्रा व उत्सवातून आर्थिक उलाढाल कशप्रकारे होते हे दर्शविले आहे. सोलापूर शहरात असणारी धार्मिक विविधता आणि त्यातून साधले जाणारे सांस्कृतिक व राष्ट्रीय ऐक्य याचा आदर्श इतर शहरातील लोकांनी घ्यावा, हा उद्‌देश या संशोधनाचा असल्याने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

## संशोधनाची साधने

प्रस्तुत प्रबंधाची मांडणी प्राथमिक आणि दुय्यम साधनांच्या अधारे केलेली असून ही साधने मुंबई व पुणे पुराभिलेखागार, गोखले अर्थशास्त्र संस्था पुणे, भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय दादर मुंबई, बॉम्बे ॲसेयाटिक सोसायटी ग्रंथालय मुंबई, मुंबई, पुणे आणि सोलापूर विद्यापीठ ग्रंथालय तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, येथील ग्रंथालय, सोलापूर जिल्हा धर्मादाय आयुक्त कार्यालयातील कागदपत्रे, हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर इत्यादि ठिकाणी असलेली कागदपत्रे, वृत्तपत्रे, नियतकालिके, गॅझिटियर्स, विविध धार्मिक ग्रंथ, विविध कोश वाङ.मय आणि अप्रकाशित प्रबंध इत्यादी साधनांचा उपयोग सदरच्या संशोधनासाठी करण्यात आला आहे. सोलापूर शहरातील विविध मंदिरे, मठ, दर्गे, मशिदी, चर्च इत्यादी धार्मिक संस्थांकडील कागदपत्रे, केलेले प्रत्यक्ष सर्वेक्षण आणि तेथील पुजारी व मंदिर समिती प्रमुखांच्या मुलाखतीचाही उपयोग प्रबंधाची मांडणी करण्यासाठी केला आहे. विषयाचे आकलन होण्यासाठी प्रबंधामध्ये नकाशे, तक्ते, व फोटो यांचाही वापर केलेला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांची सखोल माहिती समाज आणि वाचक यांच्यापुढे यावी हा प्रस्तुत प्रबंधाचा उद्‌देश आहे. प्रबंधाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

**(१)** सोलापूर शहरातील महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करणे.

**(२)** सोलापूर शहरात असणाऱ्या विविध धर्म व पंथांचा, सण, यात्रा व उत्सव इत्यादी घटकांचा अभ्यास करणे.

**(३)** शहरातील विविध धर्मियांच्या धार्मिक स्थळांचा अभ्यास करणे.

**(४)** धार्मिक स्थळांचा महाराष्ट्र व कर्नाटकातील लोकांवर पडलेला प्रभाव आणि विविध संस्कृतींचा झालेला संगम अभ्यासणे.

**(५)** धार्मिक स्थळांमुळे घडून आलेले सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक व आर्थिक अभिसरण इत्यादींचा अभ्यास करणे.

## संशोधनाची गृहितके

ऐतिहासिक पध्दतीने धार्मिक स्थळांचा अभ्यास करून अनेक प्रश्नांची उत्तरे या संशोधनातून मांडली आहेत. शहरात असणारे विविध धर्म, पंथ त्यातून निर्माण झालेले सांस्कृतिक ऐक्य, मराठी - कानडी - तेलगु आणि इस्लामी या संस्कृत्यांची देवाण-घेवाण शहरात कशा प्रकारे होत आहे. धार्मिक स्थळांचा महाराष्ट्र व कर्नाटकातील लोकांवर तसेच सोलापूर शहराच्या सर्वांगिण घटकांवर कसा प्रभाव पडला. धार्मिक स्थळांमधील देव-देवतांची उपासना पद्धती, यात्रा व उत्सव, मंदिराचे व्यवस्थापन कशा प्रकारे चालते. धार्मिक स्थळे आणि धर्म संस्थांचे विविध घटक कोणते, पारंपारिक व प्रस्थापित देव-देवतांचे वेगळेपण कसे, असे अनेक प्रश्न हा विषय निवडल्यानंतर मनामध्ये उभे राहिले होते. त्या सर्व प्रश्नांची उत्तरे या संशोधनामूळे मिळाली आहेत. या संशोधनामूळे धार्मिक स्थळांशी निगडीत असणाऱ्या अनेक घटना उजेडात आल्या. अशा विविध घटकांची मांडणी वस्तुनिष्ठ पध्दतीने करण्यात आली आहे.

## संशोधन पध्दती

या संशोधनात ऐतिहासिक व सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला असून प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधने, अप्रकाशित साधने, अभिलेखागारातील उपलब्ध मूळ कागदपत्रे व संदर्भ ग्रंथ तसेच वृत्तपत्रे, स्मरणिका, साप्ताहिके, मासिके, नकाशे, फोटो याचबरोबर सरकारी कागदपत्रे व विविध धार्मिक स्थळांची व संस्थांची कागदपत्रे इत्यादी साधनांचा वापर या संशोधन लेखनासाठी केलेला असून धार्मिक स्थळांतील लोकांचा सहभाग समजून घेण्यासाठी शहरातील विविध देवस्थान समितीचे प्रमुख, मंदिराचे पुजारी, विविध मठांतील मठाधिपती इत्यादिंच्या मुलाखतीद्वारे माहिती गोळा केलेली आहे.

## प्रबंधाचा आराखडा

प्रस्तुतचा प्रबंध हा पाच प्रकरणांमध्ये विभागलेला असून प्रकरण एकमध्ये सोलापूर शहराच्या भौगोलिक परिस्थितीचे वर्णन करुन शहराच्या इतिहासाची मांडणी क रण्यात आली आहे. प्रकरण दोनमध्ये विविध धर्म व पंथाचा आढावा घेवून शहरातील धार्मिक जीवन, चालीरिती व रुढी परंपरा, संत-महंत या प्रमूख मुद्यांचे विवेचन केले आहे. तिस-या प्रकरणात सोलापूर शहरातील विविध धार्मिक स्थळांचा अभ्यास केला आहे. त्यात प्रामुख्याने धार्मिक स्थळांच्या बांधकामाची रचना, त्या

ठिकाणी होणारी नित्यनैमित्तिक पुजा-अर्चा, उपासक व उपासना पध्दती आणि वार्षिक सण, उत्सव व यात्रा तसेच धार्मिक स्थळांचे व्यवस्थापन, पुजाऱ्यांना मिळालेली वतने, इनामे त्यांचे स्वरूप, धार्मिक स्थळांना दिलेल्या देणग्या व त्यांचे स्वरूप इत्यादी बाबींचे विवेचन केले आहे. चौथे प्रकरण धार्मिक स्थळांचा लोकजीवनावरील प्रभाव हे असून या प्रकरणामध्ये धार्मिक स्थळे ही मानवाच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक जीवनात कशा प्रकारे महत्त्वाची भूमिका बजावतात व अभिसरण घडवून आणतात, याचा आढावा घेतला आहे. पाचवे प्रकरण हे निष्कर्षाचे असून धर्म व धार्मिक स्थळांचा अभ्यास करीत असताना ज्या बाबी निदर्शनास आल्या त्याचे सिंहावलोकन करून निष्कर्ष रूपाने मांडलेल्या आहेत. त्यामध्ये मानवी जीवनातील धर्म व धार्मिक स्थळांचे महत्त्व व प्रभाव आचरणाचे नियम देव-देवता, सण-उत्सव, सांस्कृतिक संगम इत्यादीबाबतच्या निरीक्षणांचा समावेश होतो. धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने जाणवलेल्या काही उणीवा सुचनांद्वारे येथे मांडल्या आहेत.